स्थल नव्हे. असो. आता दुसरा एक मजेदार अनुभव लिहून हा लेख संपवितों.

## अनुष्टुप्वृत्तम्

दूरमार्गश्रमश्रांतं वैश्वदेवांतमागतम् ।
अतिथिं पूजयेद्यस्तु स याति परमांगतिम् ॥

**अर्थ**—लांब पल्ल्याच्या रस्त्यावरून चालत आल्यामुळें ज्याला श्रम झाले आहेत व त्या श्रमामुळें जो थकला आहे व जो वैश्वदेवाच्या शेवटीं म्हणजे काकबली टाकण्याच्या वेळीं आला आहे,अशा अतिथीचें जो पूजन करील म्हणजे त्याचें आदरातिथ्य करून त्यास जो अंत:करणपूर्वक भक्तिभावानें जेवावयास घालील तो परम गतीला जातो.

नानासाहेबांच्या मनात एकदा असा विचार आला कीं, आपण रोज वैश्वदेव करितों व बाहेर जाऊन काकबली टाकितों व "गोदोहनमात्र तत्र स्थित्वा अतिथिमाकांक्षयेत्" या मंत्रात सांगितल्याप्रमाणे गाईची धार काढण्यास जितका वेळ लागतो तितका वेळ बाहेर अतिथीची वाट पाहात उभेही राहातों; परंतु आमच्या आयुष्याच्या इतक्या वर्षांत अद्याप पावेतों एकही अतिथी त्या वेळीं आलेला नाहीं व अशा तऱ्हेचा अतिथी जर यावयाचा असेल किंवा केव्हांही येत नसेल तर मग हा मंत्र केला आहे कशाला व तो त्या वेळीं म्हणून तितका वेळ वाट तरी कां पाहावयाची ? मंत्रात लिहिलेली गोष्ट निष्कारण आहे कीं,काय? व निष्कारण नसेल तर आमच्या आयुष्यात एखादा तरी दिवस यावा कीं नाहीं ! ब्राह्मणानीं दररोज जे पंचमहायज्ञ करावयाचे आहेत ( अध्यापनं-ब्रह्मयज्ञः, पितृयज्ञः—तर्पणं, होम,--देवयज्ञः, बलिः--भूतयज्ञः, नृयज्ञः-अतिथिपूजनं ) त्यापैकीं वैश्वदेव हा एक यज्ञ आहे. शास्त्रावर विश्वास ठेवून आपण जर वैश्वदेव करितों तर हा एवढाच मंत्र खोटा तरी कसा असेल ? कीं हा मंत्र म्हणून काकबलीच्या वेळीं गाईची धार काढण्यास जितका वेळ लागेल तितका वेळ बाहेर अतिथीची वाट पाहात उभें राहाणें ही एक परंपरागत चालत आलेल रूढि

आहे म्हणून तसें करावयाचें कीं काय! पण या शंकेचें साधारण, सम्यक व समाधानकारक निरसन करणार कोण! अशा प्रकारच्या नाना कल्पनाचें नाना-साहेबाच्या मनात काहीं दिवस रण माजून राहिलें. उलगडा होईना व समाधान वाटेना पुराणमतवादी शुचिर्भूत व कालमानास अनुसरून वेदाज्ञेप्रमाणे शक्य ती नित्य नैमित्तिक करणाऱ्या प्रत्येक ब्राह्मण कुटुंबात प्रत्येक दिवशीं दोन वेळा नसला तरी एक वेळ वैश्वदेव हा होतोच, व वैश्वदेव करणारा यजमान किंवा त्याचा प्रतिनिधि वर लिहिलेला मंत्र काकबली टाकण्याच्या वळीं म्हणतो व अतिथीची वाट पाहात उभाही राहातो; पण अतिथी येत नाहीं मग कोणासच ही शंका का येत नाहीं ? व मलाच का आली आहे ? शंका खरी का खोटी हे तरी सांगणार कोण ? विचार करता करतां त्याना एक कल्पना सुचली कीं, ही शंका आपण बाबानाच विचारावी व बाबा काय सांगतात ते पाहावें.

काहीं दिवसानीं नानासाहेब बाबाच्या दर्शनास शिरडीस गेले. मशिदींत जाऊन त्यांनीं बाबाच्या पुण्य चरणाचे वंदन केलें; व नेहमीप्रमाणें बाबाच्या जवळ बसले. बाबानीं नाना कऱ्हा आलास, आणखी बरोबर कोण कोण मंडळी आहेत वगैरे कुशल प्रश्न विचारले. त्याचीं उत्तरें बाबाना नानासाहेबांनीं दिलीं. मंडळीची गर्दी बरीच होती. ती काहीं वेळाने कमी झाली. अतां आपण आपली शंका बाबांना विचारावी असे नाना साहेबांच्या मनांत आलें. इतक्यात म्हणजे शंका विचारण्याच्या पूर्वींच बाबा मध्येंच एका हातांत दुसऱ्या हाताचा मनगट धरून मोठ्यानें (दिसण्यांत) ग्राम्य भाषेंत उद्गारलें, "हो हो अतिथि येतो अहे ÷ ÷ ÷ +" तेव्हा नानासाहेब म्हणाले, खरेंच बाबा वैश्वदेव करून काकबली टाकल्यावर वर लिहिल्याप्रमाणें म्हणून आम्हीं दररोज अतिथीची वाट पाहात उभे राहातो; पण तसा अतिथी पूर्वी कधीं आलाही नाहीं व आतांही येत नाहीं. मग तो मंत्र खरा किंवा खोटा व तसा अतिथी त्या वेळीं येणार तरी कसा. प्रत्येकाची वैश्वदेव करण्याची वेळही निराळी. तेव्हा हा कपिला षष्ठीचा योग जुळावा तरी कसा ? बाबा म्हणाले,

नाना शास्त्रही खोटे नाहीं व मंत्रही खोटा नाहीं. मंत्राचा खरा अर्थ लक्षांत न घेतां भलतीच कल्पना डोक्यात घेऊन जर तू अथितीची वाट पाहात उभा राहिलास तर तसा अतिथी केव्हांही येणार नाहीं. अरे अतिथी म्हणजे साडेतीन हात उंचीचा मानव देहधारी ब्राह्मण असाच कां असावयास पाहिजे? मंत्रांत लिहिलेल्या अतिथीची व्याख्या व्याख्या इतक्या आकुंचित स्वरूपाची नाहीं. अरे ज्याचे अंतःकरण भुकेने व्याकुळ झाले आहे किंवा ज्याला अन्नाची जरूर आहे, असा जो कोणी जीव त्या वेळीं येईल तो अतिथी. मग तो मनुष्य असो, पशु असो, पक्षी असो कीड असो वा मुंगी असो. हे सर्व जीव अन्नाच्या शोधार्थ दूरदूरच्या रस्त्यावरून येत असतात त्याना येण्याला श्रमही पडतात. ते थकतात व अन्न न मिळ ल्यामुळे त्यांचे अंतःकरण पीडितही झालेले असतें; परंतु तुझें लक्ष या गोष्टी-कडे असतें कधीं? तुझा एकच विपरीत ग्रह झालेला दिसतो कीं, तो अतिथी म्हणजे साडेतीन हाताचा मनुज देहधारी व त्यांतल्या त्यात ब्राह्मण असला पाहिजे व अतिथी तर त्या वेळीं काहीं येत नाहीं. नाना जे खरे अतिथी असून त्या वेळीं येतात त्यांना तू अतिथी म्हणून मानीतच नाहींस. अरे आजपर्यंत तुझ्या घरीं मी सांगितलेल्या व्याख्येप्रमाणे काकबली टाकल्यावर लाखों अतिथी जेऊन गेले आहेत व हल्लींही शेकडों जवीत आहेत. परंतु अतिथी शब्दाच्या तुझ्या आकुं-चित कल्पनेमुळें तुला मंत्रात दिलेल्या अतिथीच्या सत्कार भोजनाचे श्रेय मिळावें कसें? नाना आता तूं हा भलताच अर्थ टाकून दे व काकबली टाकण्याच्या वेळीं ओंजळ भात बाहेर नेऊन ठेवीत जा. कोणास "हैक" "हड" करूं नकोस. कोणताही जीव तो भात खाण्यास आला तर मनात विकल्प न आणतां तो त्यास खाऊ दे, म्हणजे अनंत अतिथी तुझ्या घरीं जेवल्याचे तुला पुण्य मिळेल.

खरोखरच जगदात्म्या बाबाच्या अधिकारयुक्त दिव्य वाणींतून निघा-लला हा अतिथी शब्दाचा व्यापक अर्थ कोणीकडे व आम्ही करीत असलेला त्याच शब्दाचा आकुंचित अर्थ कोणीकडे! "यथासांग तें कर्म कांहीं घडेना, घडे कर्म तत्पुण्य गाठीं पडेना" या श्रीसमर्थोक्तीप्रमाणे प्रथम यथासांग वैश्वदेव

हातून होत नाहीं व झालाच तर त्यातील मंत्रार्थाच्या आकुंचिततेमुळें त्यांचें पुण्य पदरीं पडत नाहीं. नानासाहेबाची शंकानिवृत्ति झाली. त्याना बाबांच्या अगाध ज्ञानाचें व अतुल सामर्थ्याचे कौतुक वाटले. शिष्याच्या मनांत काय शंका आली आहे ती अगोदर जाणून तिचे निराकरण करून शिष्याच्या मनाचें समाधान करणारे अलौकिक बुद्धीचे व अद्वितीय ऐश्वर्याचे गुरू कोठें आहेत ? वरील अतिथी शब्दाचा अर्थ ऐकून नानासाहेबाना तर अत्यानंद झालाच; पण कोणत्या सहृदय भक्तास तो वाचून आनंद होणार नाहीं व बाबाच्या त्रिभुवनव्यापकतेबद्दल धन्यताही वाटणार नाहीं ! असो नानासाहेब नंतर त्याप्रमाणे वागूं लागले.

हा अर्थ केवळ एकटया नानासाहेबा पुरताच होता असे नाहीं; ज्यांना हा अर्थ पटत असेल व जे दररोज वैश्वदेव करीत असतील त्या प्रत्येक भक्ताने हा अर्थ लक्षात ठेवून त्याप्रमाणे वागल्यास श्रेयस्करच आहे.

शिष्याचे किंवा भक्ताचे मनात काय शंका आहे ती अगोदरच जाणून तो ती शंका विचारण्याचे पूर्वीच तिचे कधींकधीं प्राम्यभाव फार करून वरवर विसंगत दिसणाऱ्या भाषेत आविष्करण करून तिचे सम्यक् यथाशास्त्र व व्यापक दृष्टीनें इतर कोणास न समजूं देता, निराकरण करणे ही बाबाची अपूर्व व प्रसिद्ध हातवटी होती हें बहुतेक भक्तांना विदित आहेच. या हातवटीची व त्या त्या प्रसंगाची आठवण झाली म्हणजे " राजन् संस्मृत्य संस्मृत्य संवादमिमद्भुतं केशवार्जुनयोः पुण्यं हृष्यामि च मुहुर्मुहुः " या भगवद्गीतेतील १८ व्या अध्यायाच्या श्लोकातील संजयोक्तीचें स्मरण होऊन व त्याचप्रमाणें भगवान ज्ञानेश्वर महाराजांनी श्री ज्ञानेश्वरींत या हातवटीचें जे मार्मिक, खुबीदार रसभरित ठिकठिकाणीं वर्णन केलें आहे, त्याची स्मृति होऊन कांहीं वेळ तरी थोडया प्रमाणात का होईना, अंतःकरणांत अष्टसात्विक भाव उचंबळून मन परमानंदात गुग्ग झाल्यावांचून राहात नाहीं. दुर्दैवाने बाबाच्या सान्निध्यांत ५--७ दिवसांपेक्षा जास्त काल केव्हांही ते समाधिस्त होण्यापूर्वी अगर त्यानंतरही, राहाण्याच

प्रसंग आला नाहीं, याबद्दल वाईट वाटतें व आता अशी अमोल संधि उरलेल्या आयुष्यात कधींही येण्याचा संभव नाहीं अशी निराशेची छटा मनावर येऊन मन अतिशय हळहळते व उद्विग्न होते. नानासाहेबांच्या सहवासात जो काल गेला त्यात वरील सारख्या हजारो अनुभवाचे टिपण करून ठेविले असते व ते वाचून व त्याचे नित्य मनन करून श्री साईलीलेच्या अंकात आणखी कांहीं काल तरी देता आलें असतें,तर दिसण्यात दिसणाऱ्या वैयक्तिक बाबाची व जनी-जनार्दन स्वरूपीं व्यापक बाबाची स्वल्प सेवा केल्याचा आनंद मानता आला असता; परंतु तीही संधी माझ्या दैवदुर्विपाकामुळे गमावली गेली त्या वेळीं ते सर्व अनुभव टिपून ठेवण्याची बुद्धिच झाली नाहीं, व बाबाच्या पश्चात् श्री साई-लीला माई जगदोद्धारासाठीं अवतार घेणार आहेत व त्याच्याद्वारे बाबाचे लीला-अनुभवामृत भक्तजनास पाजण्याची सेवा घडणार आहे हे तरी कोणाच्या स्वप्नांत आले होते ! हे विचार आज मनांत येण्याचें कारण इतकेंच कीं, नानासाहेबाच्या मुखांतून ऐकलेले व टिपून ठेविलेले अनुभव भांडार आता संपुष्टात आले आहे. असो त्याची कथा तोच करणार, त्याची सेवा तोच घेणार

ठाणे,
ता. १५-३-२९.

**बाबांचें बाळ.**

## वर्गणीदारांकरितां

१ श्रीसाईलीलेचा वर्षारंभ चैत्र महिन्याचे अंकापासून आहे. नवीन वर्गणीदारांस वर्षारंभापासून अंक घ्यावे लागतील.

२ पत्ता बदलणे झाल्यास लगेच आम्हांस कळवावे. बदललेला पत्ता न कळविल्यामुळें कित्येक वेळां अंक गहाळ होतात.

३ अंकासंबंधीं पत्रव्यवहार आमचेकडे करावा.

४ लेखासंबंधीं पत्रव्यवहार संपादक व प्रकाशकांकडे करावा.

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला**

## लेखकांकरितां

१. श्रीसाईलीलेत प्रसिद्धीसाठीं पाठविलेला लेख अथवा कविता कागदाच्या एका बाजूवर, मार्जिन सोडून, सुवाच्य बालबोध लिपींत असावी. पेन्सिलीने किंवा कागदाचे दोन्हीं बाजूस लिहिलेला मजकूर छापण्यास फार त्रास पडतो.

२. लिखाणासोबत पूर्ण नांव व पत्ता दिला पाहिजे. नांव प्रसिद्ध न करितां टोपण नांवाखालीं प्रसिद्धि द्यावयाची असल्यास त्याप्रमाणे कळवावे.

३. लेख अथवा कविता हातीं आल्यानंतर १ महिन्यांत पसंति अगर नापसंति कळविली जाईल. पसंति कळविल्यानंतर, आम्हांला कळविल्याशिवाय लेखकानीं तो मजकूर दुसरीकडे छापविण्यास देऊं नये.

४. लेखांत योग्य तो फेरफार करण्याचा अधिकार आमचेकडे राहील. येईल तसा शब्दशः प्रसिद्ध करण्याची हमी आम्हीं घेत नाहीं.

५. लेखासोबत पुरेसे पोस्टेज आल्यास, नापसंत लेख परत करूं.

प्रकाशक—**श्रीसाईलीला**

**यापुढें फक्त खालील पुस्तकें आमच्याकडे मिळतील.**

श्रीसाईनाथ सगुणोपासना किं० ⁄= रु० भ० प० दासगणू कृत भक्तिसारामृत किं० ३॥ रु.

**गो० र० दाभोळकर** ५ सेंटमार्टिन्स रोड बांद्रे मुंबई नं० २०

**श्री साईनाथ भजनमाला**:—श्री० सावित्रीबाई तेंडुलकर रंगाऱ्याची चाळ, बांद्रे येथे मिळतील.

**सर्व प्रकारचे मेंदूचे विकारांवर जाग्रण व मानसिक श्रम करणाऱ्यांस अत्यंत उपयोगी**

नकलेबद्दल ] **ब्राह्मी तेल** [ सावध रहावें.

**बाळबाळंतिणीकरितां औषधें**

**बाळंत काढा नं. १** पहिल्या दहा दिवसांचा ⁄१४; **बाळंत काढा नं. २** दहा दिवसांनंतर ⁄१४; **बाळकडू**—मूल जन्मल्यापासून देण्यास योग्य ⁄८. **कुमारी आसव** लहान मुलींकरितां ⁄१२.

**सतत २५ वर्षें लोकादरास पात्र झालेलें, कोणत्याही ऋतूंत घेण्यास योग्य, अत्यंत मधुर व आरोग्यदायक**

एक रत्तल १⁄१० } **द्राक्षासव** { अर्धा रत्तल ⁄१४
दीड रत्तल २⁄४ } { ट. ख. पॅ. नि.

शिवाय आमचे कारखान्यांत टिकाऊ तयार काढे, आसवे, अरिष्टे, भस्मे वगैरे ५०० वर औषधे तयार आहेत. त्यांचे माहितीचा मोठा क्याटलाग व प्रकृतिमान भरून पाठविण्याकरितां "रुग्ण–पत्रिका" ही सात आण्याची तिकिटे आली असतां पाठवूं.

**दत्तात्रय कृष्ण सांडू ब्रदर्स**

आर्यौषधी कारखाना, चेंबूर जि. ठाणें.

टे. नं. ८७०२४ × २२२७८. दुकान दवाखाना ठाकुरद्वार मुंबई नं० २.



हें पुस्तक श्रीलक्ष्मीनारायण छापखाना, २६४ ठाकुरद्वार, मुंबई येथें **अनंत आत्माराम मोरमकर** यानी छापून **रा. आ. तर्खड** यांनी ५ सेंट मार्टिन्स रोड, बांद्रे येथें प्रसिद्ध केलें.

श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

मासिक पुस्तक.

वर्ष ८ वे ] [ अंक ३-४

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम् ।



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका ।

शंकर.

संपादक:— लक्ष्मण गणेश महाजनी.
रामचंद्र आत्माराम तर्खड.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| स्फुट विषय | ... . . ... ... ... | ८५५-८७६ |
| ,, | भागवत वाचावयास अधिकारी लागतो. .. ... | ८७६ |
| ,, | आतां तरी याल का ? ( कविता ) रा. वासुदेव लक्ष्मण गवाणकर ... ... | ८७७ |
| ,, | श्रीशिर्डी संस्थानचा शके १८४९ चा जमाखर्चाचा आढावा. ... ... ... | ८७८-८७९ |
| ,, | श्रीसाईसच्चरित ... ... .. ... | ८८० |
| कै० गोविंद रघुनाथ दाभोळकर ( चरित्र ) . . .. | | १—६ |
| ,, | परमार्थप्रपा . . . ... | १५—२२ |


## श्री साईभक्तांस विज्ञप्ति.

कोणाला श्री साईमहाराजांबद्दलचे त्याचे स्वतःचे अनुभव श्री साई-लीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनीं ते आमचेकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.

रा आ. तर्खड

—प्रकाशक

## वार्षिक वर्गणी.

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनिऑर्डरने अगाऊ रु. ३।=, व्ही. पी. ने रु. ३॥, फुटकळ अंक ।= मागील अंकास शिल्लक असल्यास ॥-

# विनंति.

महाराष्ट्राचे आधुनिक महिपति श्री संतकवि दासगणू यांचे अगदीं पहिले दोन ग्रंथ श्रीभक्तलीलामृत व श्रीसंत-कथामृत हे आतां दुर्मिळ झालेले आहेत व त्यांना आतां जनतेकडून फार मागणी आहे. अशा वेळीं त्या ग्रंथांची द्वितीयावृत्ति काढण्यापेक्षां प्रत्येक ग्रंथाचे एक किंवा दोन अध्याय क्रमशः श्री साईलीलेच्या प्रत्येक अंकांत प्रसिद्ध करण्याचें आम्ही ठरविलें आहे. व त्याप्रमाणें श्री. दास-गणूंची आम्हांला परवानगीही मिळाली आहे. तेव्हां त्या ग्रंथांच्या वाचनाची व संग्रहाची ज्यांना अपेक्षा असेल त्यांनीं या वर्षापासून श्री साईलीलेचे वर्गणीदार व्हावें म्हणजे त्यांचा हा हेतु अनायासें साध्य होण्यासारखा आहे. श्री साईलीलेच्या सध्यांच्या प्रिय वाचकांनींही आमचा हा हेतु आपल्या इतर मित्रांच्या निदर्शनास आणण्याचा प्रयत्न करावा अशी त्यांना आमची नम्र विनंती आहे.

संपादकः—श्रीसांईलीला.

## सूत्र. २१ यथा व्रजगोपिकानाम् ।

आर्या गोकुल वृंदावनिच्या, गोपसुता त्या अशाच भक्तीने ।
पावन झाल्या तैसे, पूर्णत्वे प्रेम दे मला **सांई** ॥

**विवरण** मागील एकोणिसाव्या सूत्राच्या विवरणात गोपींच्या श्रीकृष्ण-भक्तीचा बराच विचार केला आहे " **यथा राजा तथा प्रजा** " हेच तत्त्व " **यद्यदाचरति श्रेष्ठ:** " (भ. गी. ३-२१ ) इत्यादि श्लोकांत सांगितले आहे; आणि आमच्या धर्मावरील व इतर विद्याकलादिकावरील आमची श्रद्धा उडून आमच्या आर्यसंस्कृतीचा मारून मुटकून नायनाट करावा, ह्याच हेतूने प्रथमत: मेकॉले-साहेबाने हिंदुस्थानांत इंग्रजी विद्यादान सुरू केलें, अशी जी कावेबाजी पुष्कळ वर्षामागे उघडकीस आली होती, ती पूर्णत्वे यशस्वी होऊन आम्हीं आता सर्वस्वी स्वधर्मभ्रष्ट झालो आहो " **बाप तसा बेटा आणि कुंभार तसा लोटा** " ह्या म्हणीप्रमाणे आमच्या आद्य इंग्रज शिक्षकांनीं आम्हाला प्रत्येक बाबतींत आपले उच्छिष्ट-भक्षक बनविले, आणि तेणेकरून वैदिक आर्य हे स्वत: मूळचे आर्यावर्तस्थ नसून परस्थ असल्यामुळे त्याना आर्यावर्ताला मातृभूमि म्हणण्याचा हक्क नाहीं, असे दुर्मत प्रस्थापन करणारे सद्बुद्धिहीन कुतर्कपटु शब्दपंडित आमच्यातच निर्माण होऊन त्याचेच आम्हीं पूजक बनलों आहोत. ह्या बाबतींत खरा प्रकार काय आहे, त्याचा आतां विचार करू. सूर्य-चंद्रादि गोलकाना दिशा नसून त्या ह्या आमच्या पृथ्वीला कशा आल्या, त्याचा विचार केला तर ऋग्वेदरूपी आद्य ज्ञानोदय पृथ्वीच्या ज्या भागावर झाला तीच सर्व जगमान्य पूर्व दिशा ठरून तदनुरोधानेच इतर दिशा प्रथमत: निश्चित झाल्या, असे न्यायत:च प्राप्त होतें. त्याचप्रमाणे ऋग्वेदात ज्या सोमरसाचे जागोजाग वर्णन आहे, त्या रसाची वल्ली बर्फाच्छादित उत्तरध्रुव प्रदेशीं उपलब्ध होणे सर्वथा अशक्य असून, वेद हे आर्यावर्ताशिवाय इतर कोठेच केव्हाही अंशत: सुद्धा उपलब्ध नसल्याकारणाने वैदिक आर्यांच्या शाखा आर्यावर्तेतर प्रदेशीं आहेत असे मत सत्य नसून, केवळ कुटिल राजनीतिमूलक आहे, असे म्हटल्यशिवाय गत्यंतरच नाहीं " **आर्य** " ह्या

शब्दाच्या समानार्थी शब्द स्वतः आपल्याला आर्यावर्तस्थांशिवाय इतर कोणीच लाविला नसून " आर्यावर्त " हा शब्दही पृथ्वीच्या कोणत्याच इतर भागास कधींही लागू झालेला नाहीं सारांश वेद, सोम, आर्य आणि आर्यावर्त ह्या सकलाचे उत्पत्तिस्थ न आर्यावर्तेतर नव्हते, नाहीं, आणि असणे शक्य नाहीं; कारण मरीचि, अत्रि, अंगिरस पुलस्त्य, पुलह, ऋतु, आणि **वसिष्ठ** ह्या आद्य सप्तर्षींमध्यें असलेले वसिष्ठ हे " **ऋषयोमंत्रद्रष्टारो वसिष्ठादय** " ह्या "**ऋषि**" शब्दाच्या स्पष्टीकरणात प्रथम स्थानीं असून ते **वसिष्ठ-महर्षि** व त्यांच आद्य सप्तर्षींपैकीं दुसरे " **अत्रि** " ह्या दोघांचीं नावे ऋग्वेदी ब्राह्मणाच्या ऋषितर्पणांतही आहेत, आणि ऱ्या दोन्हीं ऋषींचें व "**अगस्त्य** " ऋषींचेही आर्यावर्त हेच आजन्म वसतिस्थान होते, ह्यावरून सकल मंत्रद्रष्टे ऋषि आर्यावर्तांतच जन्मास आले, असे सिद्ध होऊन वेदाची जन्मभूमि आर्यावर्तच होय असे निश्चित होते शिवाय **अगस्ति** ऋषींचा आश्रम विंध्याचलाच्या दक्षिणेस असून त्याच्या पुत्र-पौत्रादिकातही अनेक मंत्रद्रष्टे ऋषि होऊन गेले; आणि त्यांच्या मंत्रातील दर्श-पूर्णमास-कालीं करावयाचीं कृत्ये उत्तरध्रुव प्रदेशातील कालमानाप्रमाणे करावयाचीं म्हटल्यास तीं आमच्या पंधरा पंधरा वर्षांनीं करावीं, असे ठरून फारच अनर्थ होईल !

अशा परिस्थितींत दुर्बुद्धिग्रस्थ पुरुषानीं श्रीकृष्णाला जार-शिरोमणि ठरवून गोकुळ-वृंदावनाचा **लाल-बाजार** बनवणे' हा कालमहिमा असून' " **राजा कालस्य कारणम्** " ( भ गी. ५-२१ ) ह्या न्यायाने ते पातक कोणाकडे जाते, त्याचा वाचकांनीं विचार करावा. तथापि प्रायः आध्यात्मिकदृष्टिशून्य असलेल्या जगालाही " **आत्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवति** " ह्या उक्तींतील आधिभौतिक रहस्य लागू होते, हें लक्षात आणन केवळ देशहितार्थ " **न नीचो यवनात्परः** " असा बोध ज्या महात्म्यानीं केला, त्यांचा आशय न कळण्या इतके आम्हीं प्रथमतः बुद्धिमंद झालों, म्हणूनच आम्हीं अवनतीच्या मार्गास लागलों असा विचार मनांत आला, म्हणजे " आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः " ( भ गी ६-५ ) ह्या भगवदुक्तिप्रमाणें आम्हीं

आपल्याच कुल कर्मांची फळे भोगीत आहों, असे कबूल करावे लागतें. ज्या अत्युदार महात्म्यांनीं " **स्वधर्मे निधनं श्रेयः** ( भ गी ३-३५ ) असे म्हणून सर्व धर्मांविषयीं निरभिमानपूर्वक पूर्ण समता-दृष्टि ठेविली, ते विधर्मी लोकांना नीच कधींही म्हणणार नाहीत, आणि सर्व जगाच्या नीच स्वार्थमूलकतेबद्दल यवनाना ( परकीयांना ) नीच म्हटल्याशिवाय राहणारही नाहींत, कारण त्यांना अभ्युदय आणि निःश्रेयस् हीं उभयविध कार्ये साधतील, असाच उपदेश करावयाचा असतो, असो.

( १ ) जन्मादारभ्य वानप्रस्थाश्रमी असलेले मुनिश्रेष्ठ ( भ गी. १०-३७ ) **श्रीवेदव्यास**, ( १ ) सर्वशास्त्र विशारद नैष्ठिक-ब्रह्मचारी **श्रीभीष्म**, ( ३ ) देवर्षिश्रेष्ठ ( भ गी १०-२६ **श्री नारद**, ( ४ ) महाज्ञानी परमवैराग्यशील नैष्ठिक-ब्रह्मचारी श्री शुकाचार्य, (५) अखिल वेद-शास्त्रवेत्ते कौरव-पांडव-गु. श्री द्रोणाचार्य, ( ६--११ ) जन्मादारभ्य दैवीसंपत्तिमान् असलेले देवांशभूत पाडव आणि द्रौपदी ( १२ ) महासति देवी कुंति, ( १३ ) महा भाग्यवान् श्री वासुदेव, ( १४ ) देवी देवकी, ( १५) श्रीमान नंद, ( १६ ) महा भाग्यशाली श्री देवी यशोदा, आणि श्रीकृष्णाच्या समकालीन असलेल्या अमितपूज्य विभुति ह्या सर्वांना त्या भगवंताचे परमात्मत्व प्रत्यक्षपणे कळले असून तें तेव्हांपासून आजपर्यंत झालेल्या असंख्य अतींद्रिय-ज्ञानी सतांना पूर्णपणे मान्य झालें आहे; असे असतांना आमच्या इतकी नीति-अनीतीची उच्च कल्पना त्याच्यापैकीं कोणासच नव्हती, अशा दुर्भावनेनें श्रीव्यास अनीतिमान् समजणाऱ्या क्षुद्र पामरांची कींव करावी तितकी थोडीच होणार

**सूत्र. २२ तत्रापि न माहात्म्यज्ञान विस्मृत्यपवादः ।**

**आर्या.** हरि पुरुषोत्तम ऐसा, गोपींचा भावही सतत होता ।
सांई पुरुषोत्तम हा, देवा मद्भावही तसा राहो ॥

**विवरण.** भगवान् श्रीकृष्ण आणि व्रजगोपिका ह्यांच्या परस्पर प्रेमाविषयींची देवर्षिश्रेष्ठ नारदानीं प्रत्यक्षानुभवात्मक दिलेली ही साक्ष आपल्या प्रस्तुतच्या पुराव्याच्या कायद्याच्या दृष्टीनें पूर्ण विश्वासनीय ठरून तिच्या योगे श्रीकृष्ण

दूषक क्षुद्र जिवाचे लाखो कुतर्क यच्चावत् सारे कवडीमोल ठरतात शिवाय ह्या अत्यंत विश्वसनीय असलेल्या प्रत्यक्ष पुराव्याला पाचव्या सूत्राच्या विवरणांत जें एका गोपीचे वचन उद्धृत केले आहे, त्यावरून तर फारच बळकटी येते; आणि तेणेकरून भारत-भागवतादी ग्रंथात ह्या पुराव्याविरुद्ध काहीं मजकूर असल्यास तो अविश्वसनीय ठरून श्रीकृष्ण-निंदकाना केवळ अविचारी श्रद्धाहीन मतिमंद म्हणावे लागत " **समग्र ग्रंथ वाचल्यावीण । जो उगाच ठेवी दूषण । तो दुरात्मा दुरभिमानमत्सर करी ।**" ही श्री समर्थाची दासबोधोक्ति साप्रतच्या सर्वमान्य तत्त्वानुरूपच आहे; आणि तिचा विचार केल्यास साप्रतचे सारेच उतावीळ शब्द-पंडित दुराभिमानी दुरात्मेच ठरतात

**सूत्र २३. तद्विहीनं जाराणामिव ।**

**आर्या.** झाल्या महात्म्यविस्मृति, जार प्रेमासमान ते होते ।
निंद्य स्वार्थार्थचि ते, **साई** निष्काम भक्ति दे मजला ॥

**विवरण.** नैष्ठिक ब्रम्हचारी देवर्षिश्रेष्ठ श्री नारदांना जार-कर्म निंद्य **वाटणें** अगदीं स्वाभाविक आहे. गोपींचे श्रीकृष्णावरील प्रेम ज्ञानमूलक होतें असें जे मागील सूत्रात सांगितले आहे, ते लक्षात ठेविले म्हणजे—

**मय्यावेश्य मनो ये मां नित्ययुक्ता उपासते ।**
**श्रद्धया परयोपेतास्ते मे युक्ततमा मता: ॥**

( भ. गी **१२–२** )

( अर्थ-आर्या. )

मन ठेवुनि मद्रूपीं, अखंड ऐक्योंच भजति जे माते ।
**परमश्रद्धेने**-ते, योगीश्वर वाटती मलाहि सदा ॥

ह्या भगवदुक्तिप्रमाणे श्रीकृष्णभजनीं अखड **रममाण** होणाऱ्या सकल **गोपी** " योगीश्वर याज्ञवल्क्य " ऋषींच्या तोडीच्या ठरतात; आणि गोपींचे हे **महात्म्य** जाणूनच श्री कबीर एकदा आपल्या भक्ताना म्हणाले " ॥ **कबीर**

कबीर क्या कहे ॥ जा जमुनाके तीर ॥ एक एक गोपीके प्रेमसे ॥ बहगये कोटि कबीर ॥" ! ! !

## सूत्र २४. नास्त्येव तस्मिन्स्तत्सुखसुखित्वम् ।

आर्या. देहोऽहं हा भावचि, गेल्याविण शुद्ध भक्ति जीवार्थी ।
खचितचि अतिशय नोहे, सांई उमजो मला त्वमेवाहं ॥

**विवरण.** दे वाण घे वाण, असा देवघेवीचा हेतु नसून निर्निमित्तक जें प्रेम असतें, तेच शुद्ध प्रेम होय. अशा परम प्रेमाच्या आस्वदाचा जिवाला न कळतही निदिध्यास कसा असतो, त्याचे द्वितीय सूत्राचे विवरण संपण्यापूर्वी एका हिऱ्याच्या आंगठीची गोष्ट सागून स्पष्टीकरण केले आहे. त्या गोष्टीवरून जो तात्विक बोध घ्यावयाचा तो असा:-- ( १ ) शाश्वत आनंद कशात आहे, म्हणजे सदानंदस्वरूप वस्तु कोणती, ते पक्कें समजून घ्यावे ( २ ) नंतर त्या प्रियतम वस्तूचा लाभ करून घ्यावा. ( ३ ) तिचा लाभ झाल्यानतर तिच्या स्वरूप ज्ञानाचा प्रत्यक्षानुभव येऊन तिच्यावर आपलें निरतिशय प्रेम सहजच बसणार ( ४ ) असे प्रेम बसले म्हणजे तिचा निदिध्यासही कळत किंवा न कळत लागून अंतीं मृत्युकालीं तिचेंच स्मरण होऊन शेवटीं तत्सम गति मिळणार ( भ. गी. ८-६ ) ( ५ ) अर्थात् जीवेशैक्य किंवा ब्रह्मात्मैक हेंच काय तें सच्चिदानंदरूप, अशी बुद्धि एकदा कायम झाली, म्हणजे ती अशा प्रकारे देहपातानंतर परमात्मपदप्राप्तिच करून देणार ( भ. गी. ८-५ ) असा भगवद्गीतेचा सिद्धान्त आहे.

पूतना–प्राणहरण, महा अर्जुनवृक्षद्वयोन्मूलन, केश्यादि राक्षसांचे निर्दलन, कालिया-मर्दन, गोवर्धनोद्धारण, कुलयापीड नामक मत्त गजाचें सहज लीलेने केलेलें हनन, कंसच्छेदन, इत्यादि भगवान् श्रीकृष्णाच्या अतर्क्य, अद्भुत, दिव्य, बाललीला ज्या महाभाग्यशाली गोपिकांनीं प्रत्यक्ष पाहिल्या होत्या, त्या गोपिकांना त्या योगेश्वराच्या परमात्मस्वरूपाची सहजच पक्की ओळख पटली होती, म्हणूनच त्या तद्विषयक शुद्ध दैवी प्रेमाच्या स्वाधीन होऊन सदोदित त्या

प्रेमाच्या वेडांत तल्लीन असत. अशा प्रकारचे महद्भाग्य इतर कोणत्याही भक्ताना प्राप्त झालें नाहीं, म्हणून उशाना आजपर्यंत होऊन गेलेल्या सकल ब्रह्मचारी, एकपत्निव्रतस्थ गृहस्थाश्रमी, आणि संन्यासी संतांनीं अति धन्य मानिले आहे, त्याना निंद्य म्हणून आपली जिव्हा विटाळणाराइतके अहंभावपूर्ण, अविचारमूर्ति, देवद्वेषी, नराधम अन्य कोण असणार ?

आपलें सारें सुखदु:ख विसरून ज्याच्यावर आपले परम प्रेम आहे तो सुखी असेल तरच आपणास सुख होईल. असा निर्निमित्तक, नि:सीम अकृत्रिम प्रेमाचा भासला कधीं कधीं मातृ-प्रेमात दिसतो, म्हणूनच त्याला इतर सकल प्रेमांत श्रेष्ठता मिळते; आणि ह्याच कारणास्तव " न मातु:पर दैवतं " असा आर्य धर्म-शास्त्राचा सर्व सामान्य सिद्धान्त आहे.

सद्भक्ताच्या अंत:करणांतील भक्तीच्या स्वरूपाचे पंधराव्या सूत्रांत सुरू केलेले वर्णन प्रस्तुत सूत्रांत संपले

सद्भक्त न मिळे औषधाला । दांभिकांचा बाजार भरला ।
अज्ञानी करिती गलबला । श्रद्धाहीनत्वे तयेठायीं ॥ १ ॥
स्तुतिमिषें सकल निंदा । तुझी होतसे गोविंदा ।
ऐशी आर्यांना आपदा । येऊन झाले ते अनार्य ॥ २ ॥
कैशी दैवाची दुर्धर स्थिती । कां तुज न ये काकुळती ।
मज सोडवी आता श्रीपती । या दु:संगापासूनिया ॥ ३ ॥
भक्तिभाव देई मज । जेणे पुरेल सकल चोज ।
अन्यथा न होईल उमज । तव स्वरूपाचा सांइनाथा ॥ ४ ॥

## सूत्र. २५ सा तु कर्म-ज्ञान-योगेभ्योऽप्यधिकतरा ।

आर्या. कर्म ज्ञान हठाहुनि, श्रेष्ठ असे भक्तियोग सौलभ्ये ।
वर्णाचें प्रज्ञेचे तेविं बलाचें न काज साई-पदा ॥

**विवरण.** येथून पुदे एकदंर तीन सूत्रांनीं इतर मुक्ति-साधनांपेक्षां भक्ति हेच मुक्तीचे श्रेष्ठ साधन आहे, ह्या सिद्धाताचें सकारण निरूपण केले आहे

यापैकीं ह्या सूत्रानें पूर्व-मीमांसाकारांचा **कर्मयोग,** उत्तर-मीमांसाकारांचा **ज्ञान-योग,** आणि पातंजलसूत्रोक्त **हठयोग,** ह्या तिन्हीं योगमार्गांपेक्षा **भक्तियोग,** श्रेष्ठ आहे, इतकेंच सांगितलें आहे. सहज-गुणास्तव ( भ गी १८-४२ ते ४४ ) **कर्मयोग,** शूद्रवर्णास असाध्य आहे; शमदमादि नव गुणाच्या सहजत्वाभावीं ( भ. गी १८-४२ ) **ज्ञानयोग** क्षत्रियादि तीन वर्णांना असाध्य आहे; आरोग्य, बल आणि गुरुसाह्य ह्या तीन साधनाच्या अभावीं **हठयोग** सर्वांनाच असाध्य आहे; आणि ह्या तिन्हीं योगास ज्या साधनाची आवश्यकता आहे, त्यापैकीं कोणत्याही साधनाची **भक्तियोगास** आवश्यकता नाहीं , हा भक्तियोगाचा **विशेष** आहे, ह्या दृष्टीनें म्हणजे **केवल सौकर्यास्तव** भक्तियोगास इतर तिन्हीं योगापेक्षा " **अधिक तर** " म्हटले आहे, ( भ. गी. ५-२; ६-४६; व १२-२ ते ५ ) असा ह्या सूत्राचा भावार्थ आहे.

" **धर्माविरुद्धो भूतेषु कामोस्मि भरतर्षभ ॥** " ( भ. गी. ७-११ ) ह्या भगवदुक्तिप्रमाणे इंद्रियाची धर्मविरुद्ध असलेली प्रवृत्ति आवरून त्याना " **तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्य व्यवस्थितौ ॥** " ह्या भगवदुक्तिप्रमाणें केवल मनुस्मृत्यनुगामी ( भ. गी. ४-१ व १६-२४ ) करावी; आणि अशा **इंद्रियनिग्रहपूर्वक श्रद्धेनें बुद्धी ज्ञानैकनिष्ठ झाली, म्हणजे ईश-भक्तिद्वारा** ( भ. गी ९-२७ ) **ज्ञानप्राप्ति** ( भ. गी. १३-२ ) **होऊन जीव मुक्त होतो** ( भ. गी. ४-२९ ) असा एकंदर सबंध भगवद्गीतेचा मथितार्थ आहे; आणि ह्या सकल सूत्रांतही तोच सिद्धान्त प्रकारांतरानें सांगितला आहे. उक्तप्रकारें बुद्धि ज्ञानैनिष्ठ झाली म्हणजे मग साधकानें आपल्या अनुकूलतेप्रमाणें निर्गुण ब्रह्मोपासनेचा ( ब्रह्मसूत्रोक्त ध्यानयोगाचा ) आश्रय करावा, अथवा गुरु-रूपीं सगुणेश्वराची आराधना करावी, किंवा चित्तैकाग्र्यास्तव प्रतीक पूजन करावें त्याने कोणत्याही शास्त्रोक्त साधनाचा आश्रय केला तरी " **सर्वं खल्विदं ब्रह्म** " ह्या सिद्धान्ताप्रमाणे त्याची प्रत्येक क्रिया परमेश्वरार्थ होऊन तिच्यायोगें परमेश्वरपूजनच होणार. हाचि इत्यर्थ मनांत आणून श्री तुकाराम महाराजानीं म्हटलें आहे:—

" केला मातीचा पशुपति । परि मातीसी काय म्हणती ॥ १ ॥
शिवपूजा शिवासि पावे ॥ माती मातीमाजीं सामावे ॥ २ ॥
तैसें पूजिती आम्हां संत । पूजा घेता भगवत ॥ ३ ॥
आम्हीं किंकर संतांचे दास । संत पदवी नको आम्हांस ॥ ४ ॥
केला पाषाणाचा विष्णु । परि पाषाण नव्हे विष्णु ॥ ५ ॥
विष्णु पूजा विष्णुसि अर्पे । पाषाण राहे पाषाणरूपे ॥ ६ ॥
केली कांशाची जगदंबा । परि कासें नव्हे अंबा ॥ ७ ॥
पूजा अंबेची अंबेला घेणे । कांसे राहे कासें पणें ॥ ८ ॥
ब्रह्मानंद पूर्णामाजी । तुका म्हणे केली काजी ॥ ९ ॥
ज्याची पूजा त्याणेचि घेणे । आम्हीं पाषाणरूप राहणे ॥ १० ॥

ह्यांतील रहस्य नुसत्या शुष्क पांडित्याने समजणे शक्य नाहीं.

" **यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह** " असें सर्व इंद्रियातीत असलेले परब्रह्मरूप बुद्धिच्या पलीकडे आहे ( भ. गी. ३-४२ ) वरील अभंगाच्या नवव्या पंक्तींत " **पूर्णामाजीं** " असा जो शब्द आहे त्या " **पूर्ण** " **ब्रह्माचें** वर्णन ईशावास्योपनिषदाच्या नमनात

" ओम् ॥ पूर्णमद: पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते ।
पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥ "

असे केले असून, तदनुसार विचार केल्यास ती **ब्रह्म** नामक सद्वस्तु अद्वितीय, सकल दु:खाभावरूप अशा प्रकारची आहे असे ठरते. आणि श्री तुकाराम महाराजाचा आत्मनुभव पाहिला, तर ते त्या सद्वस्तुपासून स्वात्मा भिन्न आहे असे मुळींच मानीत नसत, असे म्हणावें लागते. अशा प्रकारच्या त्यांच्या उक्ति पुष्कळच आहेत, त्यापैकीं काहीं येथे देतो

" तुज मज नाहीं भेद । केला सहज विनोद ॥
तुज माझा आकार । मीं तों तूंच निर्धार ॥

मी तुजमाजीं देवा । घेसी माझ्या अंगे सेवा ॥
मी तुजमाजी अचळ । मजमाजी तूं सबळ ॥
तूं बोलसी माझ्यामुखे । मी तों तुजमाजी सुखे ॥
तुका म्हणे देवा । विपरीत ठायीं नावा ॥
अमर तू खरा । कैसा नव्हे मी दातारा ॥
चाल जाऊं संतापुढे । वाद सांगेन निवाडे ॥
तुज नांव जर नाहीं । तर माझे दाव कायी ॥
तुज रूप नाहीं । तर माझे दाव कायी ॥
देह ही पंढरी । **आत्मा पांडुरंग** । करीतसे संग अहर्निशी ॥

असो असा चिज्जडग्रंथिभेद होऊन अखंड निजानंदात रममाण असणाऱ्या संतांचा " **यद्यत्कर्म करोमि तत्तदखिलं शंभो तवाराधनम्** ॥ " असे म्हणण्याचा अधिकार असल्यामुळे त्याचे प्रत्येक कर्म इश्वरार्चनमयच होते. ह्या संतांचे गोडवे गात राहून त्यांच्या मूर्तिपूजेविषयींच्या भावनेला निंद्य समजणाऱ्या शंकरांच्या परस्पर अविरोधी नसलेल्या मतांचा विचार करण्यांत अर्थ नाहीं, ह्यास्तव हें विवरण येथेंच पुरे करितो

## सूत्र. २६ फलरूपत्वात् ।

**आर्या.** भक्त्यारंभ द्वैतीं, होउनि ती आत्मरतिच अंतीं दे ।
स्वयमेव फलहि होते, विशेष हा होय **सांइ**-भक्तीचा ॥

**विवरण.** भक्तियोगात भक्ति प्रथमतः **द्वैतमूलक** असून अखेरीस परमात्म्याशीं भक्ताचे तादात्म्य झाले, म्हणजे त्याला जी आत्मरति प्राप्त होते, ती द्वैतमूलक भक्तीचेच अद्वैतभक्तिरूपी **फल** होय अर्थात् भक्तियोगामध्यें साधनसाध्यांत तत्त्वतः भेद नाहीं, ह्यास्तव मागील सूत्रांत सर्व योगांमध्ये भक्तियोगास प्राधान्य दिले आहे; असा ह्या सूत्राचा अर्थ आहे.

एक परमात्मा मात्र नित्य-मुक्त आहे; आणि तो सर्व-समर्थ असल्यामुळे बद्ध जिवाला आत्मसम मुक्त करण्यासही स्वभावतच समर्थ आहे, हे तत्त्व न उमजून तद्भक्तीचे श्रेष्ठ फल जी मुक्ति, तिची ज्याना इच्छाच नाहीं, अशा अल्प-संतुष्ट जिवाना तो कधींही मुक्त करणार नाहीं कारण तो इच्छित फल देणारा आहे. जशी इच्छा असेल तसेच फल मिळेल ह्यावरून असें सिद्ध होते कीं, आपल्या कोत्या समजुतीने परमात्म्याच्या सर्व-समर्थत्वाची छाटाछाट करून जे त्याची भक्ति करतील, त्याना तो सर्व सामर्थ्यविहीन होऊनच फल देईल. असे लोक नेहमींच सेवाबद्ध राहाणार.

देह-बुध्या तु दासोऽहं, जीव-बुध्या त्वदंशकः ।
आत्म-बुध्या त्वमेवाहं, इतिमे निश्चिता मतिः ॥

( अर्थ—आर्या. )

ईशाच्या नियमानें, प्रारब्धाधीन देह होत असे ।
ह्यास्तव देह असे हा, ईशाचा दास सर्वदाचि खरा ॥ १ ॥

किंचिज्ज्ञत्वास्तव तो, जीव असे अंश त्या परेशाचा ॥
आत्मेश एक असती, निश्चय ऐसासि बुद्धिचा व्हावा ॥ २ ॥

अशा प्रकारें वेदान्त-रहस्य जोंपर्यंत समजले नाहीं, तोपर्यंत जीवेशां विषयाच्या भावना भ्रामकच असणार; आणि भ्रामक बुद्धीचें इच्छित फलही भ्रामकच असणार. ईश्वरस्वरूपा विषयीं विसवादि भ्रम होण्यास त्याच्या परिपूर्णत्वाला आपल्या अल्प बुद्धीनें मर्यादित करणे हेंच कारण आहे. तो कर्तुम्, अकर्तुम् अन्यथाकर्तुम् असा सर्वसमर्थ आहे, अशी भावना पाहिजे

## सुत्र. २७ ईश्वरस्याप्यभिमानद्वेषित्वाद्दैन्यप्रियत्वाच्च ॥

**आर्या.** लक्ष्मी सरस्वती ह्या, उन्मादक सांइ त्यासि नच मानी ।
अनवश्यक त्या भक्तिस, विशेष ह्याही असेच भक्तीस ॥

**विवरण** विद्येने ब्राह्मण निष्काम आणि विनयशील झाले, तर तें इष्टच आहे त्याचप्रमाणे " **त्यागाय समृतार्थानाम्** " ह्या दृष्टीने क्षत्रिय आणि वैश्य हे विद्याबल आणि शरीरबल संरक्षणार्थ गोब्राह्मणप्रतिपालक झाले, तर तेंहि इष्टच आहे. परंतु जगातील प्रत्यक्षानुभव ह्याच्या अगदीं उलट दिसतो. वर्णव्यवस्थेतेतील सुप्रजाजननाच्या तत्त्वाकडे दुर्लक्ष होऊन वर्णसंकर होऊं लागल्यामुळे उच्च गुण नष्ट झाले; आणि ब्राह्मणाच्या लोभामुळे इतर त्याचा द्वेष करूं लागून सारेच स्वधर्मकर्मभ्रष्ट झाले कुविद्याजनित लोभाचा हा सारा परिणाम आहे, ह्यामुळे अभिमानजनक कुविद्या आणि मदोत्पादक संपत्ति ह्या ईश्वराला सहजच द्वेष्य आहेत. ह्या भक्तियोगासास त्याचेहि सहाय लागत नाहीं, हा त्याचा दुसरा विशेष आहे, असे ह्या सूत्रांत सांगितले आहे ब्राह्मण वर्णाची ही भ्रष्टता पाहूनच श्री तुकारामानीं म्हटले आहे की: —

बरा कुणबी केलो । नाहीं तर दंभे असतो मेलो ॥ १ ॥
अरे तूंचि माझा आता । मायबाप पंढरिनाथा ॥ २ ॥
घोकाया अक्षर । मज नाहीं अधिकार ॥ ३ ॥
सर्वभावे दीन । तुका म्हणे यातिहीन ॥ ४ ॥

बरा कुणबी केलों । नाहीं तर दंभे असतो मेलों ॥ १ ॥
भले केले देवराया । नाचे तुका लागे पाया ॥ २ ॥
विद्या असती कांहीं । तरी पडतो अपायीं ॥ ३ ॥
सेवा चुकतों संतांची । नागवण हे फुकाची ॥ ४ ॥
गर्व होता ताठा । जातो यमपंथे वाटा ॥ ५ ॥
तुका म्हणे थोरपणे । नरक होती अभिमाने ॥ ६ ॥

अध्यात्मिक दृष्टया जसे उदार महात्म्या—भगवद्भक्ताइतके भाग्यवान् कोणीच नाहींत, तसेच व्यावहारिक दृष्टया त्यांच्याइतके कंगालहि कोणी नाहींत, कारण स्वदेहावरील सुद्धां आपली मालकी परमेश्वरास अर्पण करून ते खरे खरे

कफल्लक झाले असतात; आणि देहच ईश्वरार्पण केल्यावर अभिमान तरी राहणार कोठे? असे खरे निरहंकारी अकिंचन भक्तच परमेश्वराला प्रिय असतात, हा प्रस्तुत सूत्राचा गर्भितार्थ आहे ज्यांनीं स्वत्वाचा असा त्याग केला असेल, त्यांच्यासारखा निर्मळ परोपकार इतर कोणास साधणार ?

**सूत्र. २८ तस्या ज्ञानमेव साधनमित्येके ॥**

**आर्या.** ज्ञाने लाभे भक्ती, ऐसे कविवर्य बोलती कांहीं ।
हृदयीं प्रेमाचि नमल्या, साईचें ज्ञान केविं लाभावे ।।

**विवरण.** आतां येथून पन्नासाव्या सूत्राच्या शेवटापर्यंत तेवीस सूत्रांनीं भक्ति हेच मुक्तीचे सुगम साधान का, तिचीं साधने, उपसाधने आणि पूर्वोक्त मुख्य फलांशिवाय अवांतर फले काय आहेत, इत्यादि प्रकारचा विचार केला आहे. ज्ञान हे भक्तीचें साधन आहे, असें कित्येकाचे मत आहे, इतकाच ह्या सूत्राचा अर्थ आहे. ह्या मताप्रमाणे अनित्य, जड, निरानंदमय असे असलेले आधिभौतिक विश्व, आणि सच्चिदानंदरूपी अनंत असलेला विश्वात्म, ह्या दोहोंचे जे ज्ञान (भ. गी. १३–१ व २) ते भक्तीचें साधन होतें; पण हे ज्ञान प्राप्त करून घेण्यासच प्रथमत: परमात्मस्वरूपी असलेल्या (भ. गी. ७-१८) ज्ञानी व तत्त्वदर्शी सद्गुरूची लोकरूप (भ. गी ४-३४) भक्ति करावी लागते' ह्यावरून भक्तीच ज्ञानाचे साधन आहे, असे ठरून ज्ञानाला भक्तीचे साधनत्व संभवत नाहीं. साराश "**भक्ति ज्ञानाची माउली**" हेंच खरें आहे.

**सूत्र. २९ अन्योन्याश्रयत्वमित्यन्ये ॥**

**आर्या** ज्ञाने उपजे भक्ती, आणिक ज्ञानास उपजवी तीही ॥
अन्योन्याश्रित कोणी वदती **साईस** दोष तो वाटे ॥

**विवरण.** अन्योन्याश्रय हा न्याय-शास्त्रान्वये एक दोष असून वास्तव हें मत सहजच अग्राह्य आहे. ह्या मताने मूल-कारण निश्चित होत नाहीं.

**सूत्र. ३० स्वयंफलरूपतेति ब्रह्मकुमार: ॥**

**आर्या** भक्तिच बीज तथा फल. ऐसा सिद्धान्त नारदे कथिला ॥
बाधित कदापि नोहे. तो हे **सांईचि** मन्मुखे वदतो ॥

**विवरण.** ह्या सूत्राची सव्विसाव्या सूत्राशीं पूर्ण एकात्मता आहे, ह्यास्तव येथे काहीं एक अधिक सांगण्याचे प्रयोजनच नाहीं.

**सूत्र ३१. राजगृह भोजनादिषु तथैव दृष्टत्वात् ।**

**आर्या.** राउळ वा भोजन वा, नेत्रानीं पाहता नसे प्राप्ती ।
तेवीं शब्दज्ञाने. **साईचें** प्रेम नुपजते हृदयीं ॥

**विवरण** जिला "Intellectual Sympathy" असे गोड वाटणारे नाव देण्याची सांप्रत काळीं कावेबाज अथवा भ्याड लोकानीं सुरवात केली आहे,. ती क्रियाशून्य सहानुभूति जशी नुसती निष्फळ नसून क्वचित घातकीही असते, तद्वत शाब्दिक प्रेमही बहुधा निष्फळ असून कवीं कधी फसणुकीसही कारण होते. अशी मिथ्या सहानुभूति दर्शविणाराच्या वचनावर विश्वास ठेवणे हे आशा-ळभूतपणाचें किंवा वेडगळपणाचे लक्षण आहे. अशा खोटया चोरटया प्रेमभावा-पेक्षा उघड असलेले शत्रुत्व फार चागलें पुढील सुत्राने ह्या सूत्राची पूर्तता केली. आहे, ह्यास्तव ह्या सूत्राचा सागोपाग विचार पुढील सूत्राच्या विवरणांतच करूं.

**सूत्र ३२ न तेन राजपरितोष: क्षुच्छांतिर्वा ।**

**आर्या.** राजकृपा वा भोजन. ह्याम्या प्राप्तीविना न तृप्ति असे ।
अंतरिच्या प्रेमाविण, तेवीं नुपजेचि भक्ति **सांईची** ॥

**विवरण.** नुसत्या राजवाडयाच्या अवलोकनाने जसा राजाचा प्रसाद लाभत नाहीं, किंवा नुसते पच पक्वानाचे ताट पाहून जसे उत्तम भोजन-सुख मिळत नाहीं, त्याचप्रमाणे कोरडया शास्त्राध्ययनद्वारा होणाऱ्या शाब्दिक भक्ति-ज्ञानाने भक्तिसुखाचा लाभ होत नाहीं, असा ह्या मागील दोन्ही सूत्राचा अर्थ आहे

वेदान्त हा बोलावयाचा नाहीं, सांगावयाचा नाहीं, व ऐकावयाचाही नाहीं, पण तो करावयाचा असतो, असे आमचे परमपूज्य मित्र ब्रह्मीभूत विनायकराव रामचंद्र उर्फ अण्णासाहेब पटवर्धन हे म्हणत असत; आणि श्रीमन्नारायण स्वामींनीं आपल्या सागरसप्तकातील शांतिसागरात शब्दज्ञान व अनुभवज्ञान ह्यांतील भेद दृष्टान्तपूर्वक दाखविला आहे, तो त्यांच्याच प्रसादपूर्ण वाणीनें सांगतों.

विष्णुक्रीडा मध्यभुवनीं । सुरसा तीरीं मंगलवनीं यज्ञशर्मा महामुनी ॥ असता झाला सत्वस्थ ॥ ६ ॥ अजा सत्या शुभलक्षणा । दोघी पत्नी शोभायमाना ॥ पुत्रद्वय ते सुरूप जाणा । शुभकाळीं त्या प्रसवल्या ॥ ७ ॥ **विश्वकेतू** अजापुत्र । सुलक्षण तो विचीत्र । **त्रिलोचन** तो पवित्र । सत्यापुत्र प्रसिद्ध ॥८॥ दोघेही ते गुणपूर्ण । तातें केलें उपनयन ॥ सुकुमार त्यांहीं रात्रंदिन । एके ठायीं रहावें ॥ ९॥ कोणे एके अवसरीं । दोघे गेले, वनांतरीं ॥ समित कुश घेऊनि करीं । आश्रमाते परतले ॥ १० ॥ तंव ते मार्गीं कोणी एक । अकस्मात् आला रजक । पूर्वीं त्यानें बहुत लोक । वनीं लोभें भुलविले ॥ ११ ॥ कांहीं वालोनिया गुरळ । घेऊनि गेला दोन्ही बाळ । रजकगृहीं बहुत काळ । राहिले ते मुनिपुत्र ॥ १२ ॥ ब्राम्हणाचें पवित्र । आपले जे कुळगोत्र बहुतकाळ परतंत्र । राहातां ते विसरले ॥ १३ ॥ रजके ठेविलें अभिधान । तेथे त्यांचा अभिमान । तेंच दारा पुत्र स्वजन । आ'म ऐसे मानिले ॥ १४ ॥ रजक कुळीं वास केला । त्यानें बहुत काळ गला । त्या कुळाचीं उभयताला । ममता चित्तीं लागली ॥ १५ ॥ कोणे काळीं पूर्वींचा । कलगुरु तो आला त्यांचा । नदीतीरीं उभयताचा । योग झाला प्रसंगे ॥१६ ॥ आचार्यानें देखिले । मुनिपुत्र असें ओळखिले । कुलगुरु त्यांते पुसते झाले । कोण तुम्ही कोठील ॥ १७ ॥ ऐशी ऐकोनि वाणी । बोलले ते कर जोडोनी ॥ स्वामी आम्हीं बंधू दोन्ही । रजक आहों जातीचे ॥ १८ ॥ आचार्य बाले वचन । तुम्ही दोघे ब्राह्मण । पर जातीचा अभिमान । कैसा धरिला तुम्ही हा ॥ १९ ॥ ते मुनीत बोलती । आम्हीं आहों अधमज्जाती । ऐसे असता ब्रह्मपंक्ती प्राप्त कैंची

आम्हाते ॥ २० ॥ आचार्यें ते बैसविले । मग ते बोलूं आरंभिले । तुम्हां दोघे ब्राह्मण भले । आपणांते विसरला ॥ २१ ॥ आता सावध करा चित्त । परिसा आपुले पूर्ववृत्त । यज्ञशर्मा तुमचा तात । स्मरण कां ते करा ना ॥२२ ॥ अजा सत्या उभय जननी । सुरसा तीरीं मंगल वनीं । स्मरा कांहीं मध्यभुवनीं । तुम्ही होता उभयता ॥ २३ ॥ वृक्षाखालीं पर्णशाला । तेथे होती विशाळा । जेथे तुम्हीं वास केला । कौमार्यीं ते स्मरावे ॥ २४ ॥ रम्य वेदी केली । मेखळा ती बाधिली । उभयतांची मुंज केली । आचार्यें ते स्मरावे ॥ २५ ॥ समित् कुशाकरिता वनीं गेला उभयतां । भुरळ घोलोनि सर्वथा । रजके तुम्हा आणिले ॥ २६ ॥ आचार्यांच्या दिव्य बोलें । नष्ट झालीं माया-भुरळे । उभयताते स्मरण झाले । आम्ही दोघे मुनिपुत्र ॥ २७ ॥ पिता माता आठवली । पर्णकुटिका वेदी स्मरली । पूर्वी जेथे वस्ति केली । स्मरले स्वामी-प्रसाद ॥२८॥ आचार्यांचे समक्ष । राहिले नाहीं परोक्ष । जाणते झाले प्रत्यक्ष । आपणातें उभयतां ॥ २९ ॥ सद्गुरूशीं बोलिले । स्वामी तुम्ही धन्य केलें । दोघातेहि सोडविले । अधम जातीपासोनी ॥ ३० ॥ अपणाते ओळखिले । जन्मा ते सार्थक झाले । भ्रमदुःख ते सर्व गेले । कृपा होता स्वामीची ॥ ३१ ॥ रजकजाती क्रियाहीन । मी तों शुद्ध ब्राह्मण । एक एसे बोलोन । गेला गेहीं रजकाच्या ॥ ३२ ॥ जरी राहिलों रजक गृहीं । जरी मजशीं संबंध नाहीं । मी तो आपणा विदेही । जाणे शुद्ध ब्राह्मण ॥ ३३ ॥ दारापुत्रीं अनुराग होता । हृदयीं कांहीं विराग नव्हता । म्हणोनि ज्ञाने सार्थकता मानूनि तेथे राहिला ॥ ३४ ॥ जे जे काहीं रजकधर्म । त्या जातीचे क्रियाकर्म । विश्वकेतु जाणोनीं वर्म । करिता झाला सप्रेम ॥ ३५ ॥ त्रिलोचनें तो विचार केला । रजकाचा संबंध गेला । आला आपणा कासयाला । उठाठेवी रजकाची ॥ ३६ ॥ तेथे पूर्वीच त्रासला होता । स्वाज्ञान झालें अवचिता । विवेके तो बोलें पुढता । नलगे माते संग हा ॥ ३७ ॥ सद्गुरूचीं पाउले । धरूनि तेणें विनविले । स्वामी माझे हातीं आले । पाहिजे ते निजपद ॥ ३८ ॥ रजक सदनीं भागलों । घोर कर्मी त्रासलों । अत्यंत मी कष्टी झालो । रासभातें रक्षितां ॥ ३९ ॥ इतउत्तर ते

नसावे । दुःख सारे विसरावे । स्वामी माते भोगवावे । ब्राम्हणाचे सोहळे ॥४०॥ म्हणोनि चरणीं लागला । सद्गुरूनीं आलिंगिला । तेथोनिया तो आणिला । योगींद्राचे आश्रमीं ॥ ४१ ॥ मुनींद्राचा मेळा । आचार्यें तो मेळविला । योगाभ्यासे संस्कार केला । ठेविला तोमुनिमंदरीं ॥ ४२ ॥ सिद्धाश्रमीं राहिला मागिल सारे विसरला । निरंतर तो संग केला । योगींद्रांचा मुनींचा ॥ ४३ ॥ यातना त्या जळाल्या । कल्पना त्या वाहवल्या । कामना त्या साऱ्या सरल्या । हाता येता निजपदा ॥ ४४ ॥ आधीं ब्रम्हज्ञानी झाला । ब्रम्हत्व ऐसे पावला । मग तो भोगू लागला । ब्राह्मणाचे सोहळे ॥ ४५ ॥ दुसरा तो रजक-सदनीं । कामीं दारा-पुत्र-व्यसनीं । आपणाते ब्राह्मण मानी । दुःख कांहीं निरसेना ॥ ४६ ॥ व्यवहारीं तो दुःखी होतो रासभाते रक्षितो क्षणक्षणा स्मरण करितो । ब्राह्मण आहे म्हणोनी ॥ ४७ ॥ पूर्वींचे तें देणेघेणे । रजककर्म क्रिया करणे । दुःखचि होऊं लागले तेणे । वळता वळता रासभे ॥ ४८ ॥ रजकाचें तो रक्षी धर्म । तेणे होऊंच लागे श्रम । आपणा म्हणे मी नव्हे अधम । ब्राह्मण आहे जातीचा ॥ ४९ ॥ दुष्टधर्मे दुःखी होतो । ब्राह्मण आहे स्मरण करतो । आपले तैसे ध्यान धरितो । जैसा होता प्रथम तो ॥ ५० ॥ शतवार स्मरण केले । सहस्रवार ध्यान धरिले । म्हणोनी काय प्राप्त झाले । ब्राह्मणाचे सोहाळे ॥५१॥ जो मठीं राखी दासी । तो लाजिर्वाणा संन्यासी । विषयवासना ज्या मानसीं तो योगींद्र कैसा म्हणावा ? ॥५२॥ निर्वाण शान्ती **त्रिलोचनाची** । **विश्वकेतूस** प्राप्त कैची । संसारसंगे अंतरींची । तळमळ कांहीं जाईना ॥ ५३ ॥ ॥ **विश्वकेतू निर्दोष** । ब्रह्मज्ञानी विशेष । **त्रिलोचन** तो **प्राप्तपुरुष** । श्रोतीं ऐसे जाणावे ॥ ५४ ॥ येथे ज्ञान आणि ज्ञाता । सर्वतोपरी एकचि असतां ज्ञान असता सर्वथा । प्राप्ती नाहीं एकाते ॥ ५५ ॥ एकास ब्रह्मज्ञानयोग । एकास ब्रह्मप्राप्तिभोग । एवं प्रकारे लक्षण विभाग । दोन्हीं ठायीं ओळखा ॥५५॥ ब्रह्मज्ञान होता पुढती । ब्रह्मप्राप्ति काय उरती । **इतिहासें** तो आपुले चित्तीं । स्पष्ट ऐशीं जाणावी ॥ ५७ ॥ ज्ञान झालिया उपरी । ब्रह्मप्राप्ति उरते खरी । श्रीकृष्ण ऐसें निर्धारी । अर्जुनाते बोधिता ॥ ५८ ॥ " **ततो मां तत्त्वतो**

ज्ञात्वा । विशते तदनंतरम् ।" मातें तत्त्वंपदे आधीं । जाणोनिया बा निरुपाधी । तदनंतर तो विशुद्धबुद्धि । प्रवेश करितो स्वरूपीं ॥ ५९ ॥ विशते म्हणजे पावतो । ऐसा येथे अर्थ होतो । प्राप्तीचा जो यत्न करितो त्याते येतो अनुभव ॥ ६० ॥ " असंयतात्मना योगो दुष्प्राप्य इति मे मतिः । वश्यात्मना तु यतता शक्योऽवाप्तुमुपायतः ॥ ६१ ॥ " चित्त ज्याचे चंचळ । त्याते नाहीं प्राप्तिफळ । यतचित्त जो निर्मळ । त्यातें लाभ उपायें ॥ ६२ ॥ प्राप्तीचा तो उपाय कैसा । कैसा त्याचा भरंवसा । प्राप्ती होते थोडक्या दिवसा । चतुर्थोल्हासीं परिसावे ॥ ६३ ॥ दुष्काम लोभ निजरोष मतंग मोह । त्यागोनि दुष्ट परमत्सरही त्रिदेह । जे सत्यशील गुरुभक्त विरक्त झाले । सद्योगसिद्ध मुनि ते भवपार गेले ॥ ६४ "

ज्ञानी आणि तत्वदर्शी ( भ. गी. ४—३४ ) अथवा ज्ञान आणि विज्ञान ( भ. गी. ६--८ ) असा जो परोक्षापरोक्षज्ञानभेद भगवान श्रीकृष्णानीं केलेला आहे, त्याचे हे महा—सतकथित स्पष्टीकरण किती अमोलिक आहे ? षड्रिपु-त्याग, दृढ वैराग्य आणि निःसीम गुरुभक्ति ह्याचे परोक्षज्ञानास पूर्ण सहाय असल्याशिवाय अपरोक्षज्ञानप्राप्ति होत नाहीं, अशा अर्थाच्या शेवटल्या श्लोकाची श्रीमद्भगवद्गीतेशीं पूर्ण एकात्मता आहे ( भ. गी ३--३७, ३--४१; ४--३४ ते ३९. ६--३३ ते ३६; १६--२१ ) असे कोण म्हणणार नाहीं ? आणि भगवद्गीतेतील स्थितप्रज्ञ ( भ गी. २--५५ ते ७२ ), परमेश्वर भक्त ( भ गी. १२--२ ते २० ), ज्ञानी ( भ. गी. १३--१ ते १७ ), गुणातीत ( भ. गी. १४--२२ ते २७ ) आणि दैवी संपत्तिमान पुरुष ( भ. गी. १६--१ ते ३ ) हे सारे महात्मे दृढ वैराग्यशील, ज्ञानमार्गी, आणि संन्यासी भगवद्भक्त नव्हते, असे तरी कोणत्या तोंडाने म्हणता येईल ?

**सूत्र ३३ तस्मात्सैव ग्राह्या मुमुक्षुभिः ॥**

**आर्या.** ऐसा मुमुक्षु जीवां, सर्वोत्तम भक्तियोग **साईचा** ॥
साद्यंत एकरूपी, आणिक सकलां सुसाध्यही आहे ॥

**विवरण:**—एकोणीस ते बत्तीस ह्या चौदा सूत्रात परमेश्वर-प्राप्ति होण्यास भक्तियोगासारखा सुलभ मार्ग अन्य नाहीं, असे प्रथमत: प्रस्थापित करून प्रस्तुत सूत्राने कल्याणेच्छु पुरुषानीं आत्मोद्धारार्थ ह्या भक्तियोगाचेंच अवलंबन करावें, असा उपदेश केला आहे. अर्थात् ह्या चौदा सूत्राचा हा उपसंहार अखिल भगवद्गीतेच्या उपसंहाराशीं ( भ. गी १८--६४ ते ६६ ) पूर्णत्वे एकात्मक आहे. देवर्षिवर्य श्रीमद्भगवद्विभूतिमन्नारदाचे ( भ गी १२-२६ ) भगवान् श्रीकृष्णाशीं पूर्ण पत्तैक्य असलेच पाहिजे, आणि ते आहे; ह्यांत शंका नाहीं. भगवद्गीतेच्या उपसंहारातील " **अहं त्वा सर्व पापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुच: ॥** " ह्या अगदीं शेवटच्या शब्दावरून गीतोपदेश केवळ मुमुक्षुजनासाठीं आहे, हा सिद्धान्त सहजच प्रस्थापित होतो; आणि ह्या सूत्रातील उपदेशहि त्याच्याचसाठीं आहे; तेव्हां नारद व श्रीकृष्ण ह्याचा उपदेश भिन्न कसा असणार ?

**सूत्र ३४ तस्या: साधनानि गायंत्याचार्या: ।**

**आर्या.** भक्त्याचार्यी कथिलीं, भक्तीचीं साधने अनेक परी ।
ती साधन संपत्ती, **सांई** मजला मिळो कृपे तुमच्या ॥

**विवरण:**—सूत्र पंधरा ते चोवीस ह्या दहा सूत्रात जीं भिन्न ऋषींचीं भक्तीचीं भिन्न **लक्षणें** सागितलीं आहेत, त्याचा विचार करून नारदानीं आपलें स्वत:चे भक्ति-लक्षण सर्वोत्तम आहे, असें सोदाहरण दाखविलें आहे. परंतु आता जीं भक्तीचीं **साधने**, म्हणजे भक्तीचीं उपसाधने सागणार आहेत, त्यासबंधीं सर्वांचे मतैक्यच आहे. ह्यास्तव येथे पंधराव्या सूत्रातील मतभिन्नत्वाचा उल्लेख केलेला नाहीं. तथापि ह्यापुढील सूत्र पसतीस ते बेचाळीस ह्या आठ सूत्रात जो साधनविचार केला आहे. त्यातीलं साधनामध्येहि तरतमभाव असल्यामुळे ईश्वरभावनेने सद्गुरुशरणागत होणे, ह्या अखेरच्या साधनासच प्राधान्य दिले आहे.

## सूत्र ३५. तत्तु विषयत्यागात्संगत्यागाच्च ।

**आर्या.** शब्दादिक विषयांच्या, मध्यें ज्ञानेंद्रिये सदा रमतीं ।
त्यांचा वीट मनाला, येवो भक्त्यर्थ **सांइनाथ** हरे ॥

**विवरण.** सूत्रोक्त विषयत्याग आणि **संगत्याग** हींच दोन आद्य साधने भगवान् श्रीकृष्णांनीं अर्जुनाला अगदीं प्रथमतः उपक्रमाध्यायातच सांगितलीं असून विषय-स्मरणोद्भूत विषयसंग आत्मनाशकारक आहे ( भ. गी. २--६२ व ६३ ) असें बजाविले आहे. त्याचप्रमाणे **विषय** आणि **संग** ह्यांच्या हेयत्वाबद्दल असा उपदेश करण्याच्या पूर्वी ज्या उपादेय गुणाचा उपदेश केला आहे ( भ. गी. २–४५ ) ते ( १ ) निस्त्रैगुण्य म्हणजे सर्वारंभपरित्यागी गुणातीतता, ( २ ) निर्द्वंद्वता म्हणजे मायोद्भूत विचारांतर्गत " **अहं, त्वं** " इत्यादि सकल द्वैताचा त्याग, ( ३ ) नित्यसत्वस्थता म्हणजे अखंड ब्रह्मात्मैक्यभाव, ( ४ ) निर्योगक्षेम-वान् म्हणजे देहभावनात्याग आणि ( ५ ) आत्मवान् म्हणजे निजानंदनिमग्नता, हेच पांच पूर्ण संन्यासात्मक नैष्कर्म्यसिद्धिदायक गुण होत. असो

आता **विषय** आणि **संग** ह्या दोन शब्दांच्या अर्थाचा विचार करूं, म्हणजे भगवान् श्रीकृष्णाच्या मताप्रमाणे साधकाला एकंदर हेय ( त्याज्य ) गुण काय आहेत, ते समजेल **विषय** हा शब्द भगवद्गीतेंत एकंदर आठ वेळ आलेला आहे ( भ. गी. २--५९, ६२, ६४; ४--२६; १५-- २, ९, व १८–३८, ५१ ) त्यापैकीं फक्त चारच स्थळावरून त्याचा अर्थ निष्पन्न होतो (भ. गी ४--२६; १५--९; १८- ३८, ५१ ). ह्या चार स्थळाप्रमाणे तो अर्थ असा ठरतो कीं शब्द, स्पर्श, रूप, रस, आणि गंध, हे जे पंचमहाभूताचे **गुण** आहेत त्यांनाच **विषय** म्हणतात. हे विषय जिवाला त्याच्या ज्ञानेंद्रियानीं समजतात. आणि विषयेंद्रियसंयोगाची किंवा वियोगाची ही अहंकारमूलक म्हणजे देहोऽहंभावमूलक मनाची प्रीति ( आसक्ति ) तिलाच **संग** म्हणतात. ह्या संगालाच इच्छा, काम असे पर्याय शब्द आहेत, व ह्याच कारणास्तव काम हा मनःसंकल्पोद्भूत आहे ( भ. गी ६--२४ ) असें म्हटलें असून " **न किंचिदपि**

चिंतयेत्" (भ. गी--७--२५) ही आज्ञा पूर्वी सांगितलेल्या (भ. गी. २-६२) संगत्याग साधनार्थ आहे, ह्याविषयीं शंका घेण्याचे आतां काहींच प्रयोजन उरले नाहीं अर्थात् ज्ञानेंद्रियांचे सर्वच विषय आधिभौतिक असल्यामुळे प्रत्येक साधकाला सकल आधिभौतिक विषय समूळ त्याज्यच ठरतात; म्हणजे साधकानीं अपरिहार्य प्रारब्ध प्राप्त असलेल्या आधिभौतिक कर्मांशिवाय इतर कोणत्याही आधिभौतिक कर्मांचा मनांत नुसता विचार सुद्धा आणता उपयोग नाहीं, असा जो येथवर केलेल्या विचारावरून भगवद्गीतेचा मथितार्थ ठरला, तोच प्रस्तुत सूत्राचा अर्थ आहे; आणि प्रारब्धकर्म अपरिहार्यत्वास्तव सहजच मन:संकल्पाशिवायही अवश्य घडणार असल्यामुळें त्याचाही विचार मनात अणण्याचे प्रयोजन नाहीं. साराश भगवद्गीतेप्रमाणे, आणि तसेच श्रीनारदांच्या ह्या चौऱ्याशीं भक्तिसूत्राप्रमाणे साधकाला बुद्धिपूर्वक अवश्य कर्तव्य असे कोणतेही आधिभौतिक कर्म नाहीं. प्रारब्धाच्या हवालीं देह करून जिवानें आत्मोन्नतीच्या मार्गास लागावे, हाच मनुष्य देह निर्माण करण्यांत ईश्वराचा आद्य हेतु आहे.

**संग** हा शब्द भगवद्गीतेत एकंदर अकरा वेळ आलेला आहे; परंतु त्याचा स्पष्टार्थ कोठेंच सांगितलेला नाहीं. तथापि आम्हीं केलेला अर्थ कोणासही अमान्य होण्याचे कारण नाहीं असे वाटते.

विषयेंद्रियसंयोगासक्ति किती घातक असते, ते श्रीमद्भागवतातील एका श्लोकात सांगितले आहे, तो श्लोक असा आहे:—

> कुरंग मातंग पतंग भृंग मीना हता: पंचभिरेव पंच ।
> एक: प्रमाथीस कथं न हन्यते य: सेवते पंचभिरेव पंच ॥

( अर्थ--आर्या. )

> हरिणा मंजुल **शब्दचि, स्पर्शाची** लालसा गजा मारी ॥
> **रूपाच्या** लोभानें, पतंग मरतो तसाचि भृंग **रसें** ॥ १ ॥